(वितरण आदेश क्रमांक-१०)

सन २०१७-२०१८ या वर्षासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानासाठी MKSP करिता SCSP प्रवर्गासाठी अर्थसहाय्य.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः मजिअ - २०१८/प्र.क्र. ६६ /योजना-३
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ३० मार्च, २०१८

वाचा :- १. केंद्रिय ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे क्र.के११०११/०९/२०१६/एमकेएसपी/एएपी/महा, दिनांक १ मार्च, २०१८ चे वितरण आदेश.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांस महिला सशक्तीकरण परियोजनेच्या अनुसूचीत जाती उपयोजनेकरिता (SCSP) दुसऱ्या हप्त्याचा रु.५८२.७८ लाख इतका निधी वितरीत केलेला आहे. केंद्र शासनाने केंद्र हिस्सा महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या बँक खात्यात थेट जमा केला आहे. त्यामुळे सदर केंद्र हिस्सा निधी रु.५८२.७८ लाख, समरुप राज्य हिस्सा रु.३८८.५२ लाख वितरित करणे आवश्यक आहे. परंतू सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात महिला सशक्तीकरण परियोजना या योजनेच्या राज्य हिश्याकरिता सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे रु.३३८.७१ लाख इतका निधी अर्थसंकल्पीत केलेला आहे. सदर अर्थसंकल्पीत केलेला रु.३३८.७१ लाख इतका निधी वितरित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ मध्ये महिला किसान सशक्तीकरण परियोजनेसाठी राज्य हिस्सा (२५०१ A०६६) करिता सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पीत केलेला रु.३३८.७१ लाख (रु. तीन कोटी अडतीस लाख एकाहत्तर हजार फक्त) इतका निधी दिनांक ३० मार्च, २०१८ रोजी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (B.D.S) द्वारे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानास वितरीत करण्यात आला आहे.

२. सदर रक्कम उप संचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सुपूर्द करण्यात आला आहे.

३. सदर रक्कम रु.३३८.७१ लाखाचा खर्च "मागणी क्र.एल - ३, २५०१ ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम, ०६, स्वरोजगार कार्यक्रम, ७८९, अनुसूचित जाती उपयोजना, १०१, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना, (०१) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार, (०१) (०१) महिला किसान सशक्तीकरण परियोजनेसाठी विशेष घटक योजनेसाठी अनुसूचित जातींना अर्थसहाय्य (राज्य हिस्सा) (२५०१ A०६६) ३३ अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदी मधून भागवावा.

४. हे अनुदान ज्या प्रयोजनाकरीता मंजूर करण्यात आलेले आहे, त्याच प्रयोजनाकरीता खर्च करण्यात यावे. अन्यथा ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल, याची अमंलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

५. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेले अनुदान कोषागारातून काढल्यानंतर पुढील माहिती त्वरीत लेखाधिकारी कार्यासन क्रमांक योजना-२, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, यांचे कडे पाठवावी. १) मंजूर केलेली रक्कम, २) कोषागारातून काढलेली रक्कम, ३) रक्कम काढल्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक. ४) महालेखापाल कार्यालयातील रक्कमेशी ताळमेळ केल्याचे प्रमाणपत्र.

६. सदर शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक्र दिनांक २० एप्रिल, २०१६ तसेच दिनांक १८ एप्रिल, २०१७ व दिनांक ३० जून, २०१७ व दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये केंद्र पुरस्कृत योजनांसाठी निधी तसेच राज्य शासनाचा समरुप हिस्सा प्रशासकीय विभागाने त्यांचे स्तरावर वितरित करण्याच्या प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१७३४१८२७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2018.03.30 14:11:06 +05'30'

(अनिल काळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर (पाच जादा प्रतींसह)
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५ वा मजला, दक्षिण विंग (एसबीआय साईड), सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
३) उप संचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५ वा मजला, दक्षिण विंग (एसबीआय साईड), सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
४) जिल्हा कोषागार अधिकारी , ठाणे,
५) उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई.
६) वित्त विभाग (व्यय-१५) व (अर्थ-१७) मंत्रालय मुंबई-३२.
७) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (विघयो), मंत्रालय, मुंबई-३२.
८) कार्यासन अधिकारी, वित्त-७, वित्त-१, योजना-२ व योजना-७, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
९) निवडनस्ती.